# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gangsters**

**Police Station** :- **Shirpur**

**Date of Good Work done** :- **26/11/2022**

**Brief of the work done :-**

अट्टल चोरट्यांच्या पो.स्टे.शिरपूर पोलीसांनी आवळल्या मुसक्या.

## गुन्ह्यांची होणार उकल • शिरपूर पोलिसांनी आवळल्या मुसक्या

# अट्टल चोरट्यांना रंगेहात अटक

शिरपूर जैन, (वा.). शिरपूर पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या बोराळा धरण येथे गावकऱ्यांनी चोरी करण्यास आलेल्या दोन अट्टल चोरट्यांना पकडले. ही घटना 23 नोव्हेंबर रोजी रात्री 11 वाजता बोराळा धरण येथे घडली.

शिरपूर पोलिसांनी दोनही अट्टल चोरट्यांना तत्काळ ताब्यात घेऊन अटक केली आहे. मुसक्या आवळलेल्या चोरट्यांकडून पूर्वीच्या चोरीच्या घटन उघडकीस येण्याची शक्यता आहे. शिरपूर पोलिस सुत्राकडून प्राप्त माहितीनुसार गोविंदा अर्जून धोंगडे ग्रामपंचायत कर्मचारी शिरपूर रा. खंडाळा शिंदे हे बोराळा धरणावर त्याच्या ड्युटीवर जात असताना त्यांना संतोष घायाळ यांनी फोन करून माहिति दिली की, धरणावर चोर आलेले आहेत व धरणावर असलेल्या शिरपूर पंप हाऊसचे कुलूप पाहरीने तोडले आहे. तसेच रिठद पंप हाऊसचे शटर तोडले आहे व सध्या चार चोर टाकीवर आहेत. तेव्हा गोविंदा धोंगडे गावातील लोकांच्या सोबत धरणावर गेला असता त्या ठिकाणी बोराळा येथील 10 ते 12 लोक हजर होते. त्या लोकांच्या मदतीने चोरांचा शोध घेतला असता एक चोर टाकीच्या मागे लपून बसला होता त्याच्या हातात लोखंडी पहार होती व दुसरा चोर लोकांना पाहून मारण्याच्या धाकाने घाबरला व त्याने धरणात उडी मारली. तेव्हा लोकांनी त्याला पाण्याच्या बाहेर येण्यास सांगितले नंतर तो पाण्याच्यावर आला, दोनही चोरट्यांनी चोरी करण्याच्या उद्देशाने पंप हाऊसचे शेटर फोडले व कुलूप तोडले तसेच मोटरचे चैन ब्लॉक काढले.



## ठाणेदार वानखेडे यांच्या मार्गदर्शनात कारवाई

या घटनेबाबत शिरपूर पोलिस स्टेशनचे ठाणेदार सुनील वानखेडे यांना फोन आला. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता ठाणेदार सुनील वानखेडे यांनी पोहेकॉ संतोष पाईकराव, प्रवीण शेंदरे, गौरीशंकर तेलंगे, ज्ञानबा खिल्लारे यांना तातडीने घटनास्थळी रवाना केले. या पथकाने घटनास्थळावरून दोन अट्टल चोरट्यांना ताब्यात घेऊन शिरपूर पोलिस स्टेशनला आणले. गोविदा अर्जुन धोंगडे यांनी 24 नोव्हेंबर रोजी फिर्याद दिली. या फिर्यादीवरून शिरपूर पोलिसांनी वैभव नामदेव कुंभारे (23), जिजेबा दाजिबा चौधरी (49) दोघेही रा. ताकतोडा ता. मालेगाव याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून अटक केली आहे. बोराळा परिसरातील शेतकऱ्यांच्या यापूर्वी सुद्धा मोटार पंप वायर चोरी गेले आहे. सदर चोर्या सुद्धा याच चोरट्यांनी केल्या असाव्या, असा संशय असून त्या आता उघडकीस येण्याची शक्यता आहे. असे ठाणेदार सुनिल वानखेडे यांनी सांगितले.